अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१९.०५.२०२२

# प्रेस नोट

**खाजगी इसम श्री.पराग पुरुषोत्तम सोनवणे, वय–३९, व्यवसाय–रोजंदारी रा.प्लॉट नं.२३, खोटे नगर, जळगांव ता. जि.जळगांव यांना ४००/–रु. लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्वत: स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंध विभाग, जळगांव यांची कारवाई.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव |
| २ | **गुन्हा नोंद कमांक** | :– | जळगांव शहर पो.स्टे. गु.र.नं. ०१२५/२०२२ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ अ प्रमाणे... |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | श्री.पराग पुरुषोत्तम सोनवणे, वय–३९, व्यवसाय–रोजंदारी रा.प्लॉट नं.२३, खोटे नगर, जळगांव ता. जि.जळगांव<br>**(खाजगी इसम)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१९/०५/२०२२<br>४००/–रु.लाचेची मागणी |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | ४००/–रु. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१९/०५/२०२२ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील तक्रारदार हे त्यांचे जुन्या रेशनकार्डची दुय्यम प्रत तयार करण्यासाठी विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन जबाब व आवश्यक ते आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला इत्यादी कागदपत्रांसह दि.१३/०५/२०२२ रोजी तहसिल कार्यालय,जळगांव येथील पुरवठा शाखेच्या कार्यालयात गेले होते. तेव्हा आरोपी पराग सोनवणे (खाजगी इसम) यांनी फिर्यादी यांचे जुन्या रेशनकार्डची दुय्यम प्रत तयार करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात ४००/–रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दि. १९/०५/२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयाकडे लेखी तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.१९.०५.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन स्वत: चा आर्थिक फायदा करुन घेण्यासाठी तहसिल कार्यालय जळगांव येथील लोकसेवकांवर प्रभाव असल्याचे दर्शवुन तक्रारदार यांचे जुन्या रेशनकार्डची दुय्यम प्रत तयार करुन आणुन देतो असे सांगुन पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडेस ४००/–रुपये लाचेची मागणी केली.तसेच सदर लाचेची रक्कम आरोपी यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री कमांक:–** १०६४

**दुरध्वनी कमांक:–** ०२५७–२२३५४७७

**व्हॉटस्अॅप कमांक:–** ८७६६४१२५२१

(शिक्का: पोलीस उप अधिक्षक • अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव)

19.5.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**